पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक १७**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २८/७/२०२०** रोजी सकाळी ११:०० (अकरा) वाजता **स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, पुणे महानगरपालिकेची नवीन विस्तारीत इमारत येथे दृक श्राव्य (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) द्वारे भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्र. ३२३**

मा.हरिदास चरवड यांचे दि.२०/७/२०२० चे पत्र.

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव संपूर्ण पुणे शहरात मोठया प्रमाणात वाढला असून दररोज रुग्णसंख्या नवनवे उच्चांक गाठत आहे. कोरोनाने गंभीर स्वरुप धारण केलेले आहे. त्यातच वयोवृध्द आणि अत्यवस्थ रुग्णांना व्हेंटीलेटर, ऑक्सिजन बेड न मिळाल्याने मृत्यूचे प्रमाणही वाढत आहे. तरी या साहित्याची तातडीने गरज लक्षात घेता माझ्या प्रभाग क्र. ३३ अ (वडगाव धायरी-वडगाव बुद्रुक) साठीच्या सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकातील २५ लाख रुपये निधी कमी करुन उद्‌भवलेल्या कोरोना महामारीच्या काळात रुग्णाच्या सोयीसाठी सिंहगड रोड, लगड मळा येथील स्व.मुरलीधर पांडुरंग लायगुडे पुणे मनपा दवाखाना येथे ऑक्सिजन बेड, व्हेंटीलेटर, इतर वैद्यकिय साहित्य खरेदी करण्यासाठी वापरण्यात यावा.

**माहितीसाठी आलेले विषय**

**विषय क्र. ३२४**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील दि. १६/६/२०२० ते दि.३०/६/२०२० पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तद्नुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.४/१७० दि.१६/७/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ३२५**

दि. २९/६/२०२० ते दि. ५/७/२०२० अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण १५ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी जा.क्र. मआ/अग्निशमन/१७७ दि. १७/९/२०२० ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

**सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स**

**विषय क्र. ३२६**

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाचा प्रतिबंध करणे कामी स्थापन करण्यात आलेल्या विलगीकरण कक्षाकरीता क्वारंटाईन सेंटर तसेच पुणे महानगरपालिकेच्या विविध विभागांसाठी मागणीनुसार ए-४ साईज व लीगल साईज पेपर खरेदी करणे कामी निविदा मागविल्या असता आलेल्या ३ पात्र निविदांपैकी निविदाधारक मे.नमन एंटरप्रायझेस यांची निविदा सर्वात कमी रक्कमेची असल्याने त्यांचेकडून र.रु.९५,०९,५००/- (सर्व करांसह) पर्यंत काम करुन घेणेस, त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा, तसेच सदर कामापोटी होणारे बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/भांडार/१७६ दि.१७/७/२०२० चे पत्र.

**मागील सभेचे विषय**

**विषय क्र. ३२७**

कोविड-१९ ची रोगराईमुळे तसेच अन्य कारणामुळे दि. ३१/०३/२०२० अखेर पर्यन्त झालेल्या कामांची/आदा न केलेल्या बिलांकरिता मा. स्थायी समिती ठराव क्रमांक ८३ दि. २८/०४/२०२० अन्वये दि.३०/०५/२०२० अखेर पर्यन्त दिलेल्या मुदतवाढी मध्ये प्राप्त झालेली सन २०१९-२०२० च्या

अर्थसंकल्पातील ज्या भांडवली व विकास कामांची देयके प्राप्त झाली आहे अशी बिले अदा करण्यासाठी सन २०२०–२१ च्या अंदाजपत्रकामधून तरतूद उपलब्ध करुन देणेस व अशा कामांची देयके अदा करण्यासाठी खालीलप्रमाणे कपात करण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/१३१ दि.१६/६/२०२० चे पत्र.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मुख्य खाते– | सन २०२०–२१ या आर्थिक वर्षासाठी मान्य तरतूद र.रु.३७५.६० कोटी | सन २०२०–२१ या आर्थिक वर्षाच्या संबंधीत मुख्य खात्याच्या भांडवली तरतूदीमधून करावी. |
| २) | ' स ' यादी– | सन २०२०–२१ या आर्थिक वर्षासाठी मान्य तरतूद र.रु.२९७.१३ कोटी | अ) सन २०२०–२१ च्या अंदाजपत्रकातील भांडवली ''स'' यादीच्या तरतूदीतून सरसकट सर्व मा.सभासदांच्या ''स'' यादीला २५ टक्के कपात **किंवा**<br>ब) ज्या मा. सभासदाच्या कामांची देयके आदा करावयाची आहेत . त्याच मा. सभासदांच्या सन २०२०–२१च्या अंदाजपत्रकातील भांडवली ''स'' यादी मधुन |

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. १४/७/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ३२८**

मा.सौ.मुक्ता टिळक, आमदार व मा.दिपक पोटे यांचे दि. २९/६/२०२० चे पत्र.

पुणे शहरात कोविड–१९ विषाणू संसर्ग रोखणेकामी उपाययोजना व उपचार करणेकरीता विविध साधनसामुग्री खरेदी करणेसाठी र.रुपये १ कोटीचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२०–२०२१ चे अंदाजपत्रक,हेरिटेज अंतर्गत विविध कामे करणे, पान क्र. २७४, यादी क्र. एसजे२१, बजेट कोड– सीई२२अे७०५/एसजे२१–३४, प्रभाग क्र. १५ क मध्ये जुने मंडई जतन व संवर्धन संग्रहालय करणे | १ कोटी | –– |
| <u>नविन सुचविलेले काम</u> | | |
| पुणे शहरामध्ये हेल्थ प्लॅन अंतर्गत रेफेरेन्स सेंटरमधील उपकरणे खरेदी व इतर खर्च बजेट कोड – आरई१७एफ१४७व्ही | –– | १ कोटी |

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. १४/७/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ३२९**

विविध प्रकारच्या बांधकाम परवानगी अंतर्गत आकारण्यात येणारे विविध प्रिमियम/शुल्क टप्पेनिहाय भरणेची सवलत देणेसाठी खालील बाबीस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/शआ/१३५ दि. १६/६/२०२० चे पत्र.

१) पुणे महानगरपालिका अधिनियम मनपा/लोकसेवा/मआ/४५९/२०१५ दि.१५ जुलै २०१५ अन्वये येणारे प्रिमियम शुल्क र.रु. ५० लक्ष पेक्षा जास्त असल्यास प्रस्तावांना प्रिमियम शुल्क टप्प्यामध्ये खालीलप्रमाणे भरण्यास प्रशासकीय मान्यता मिळणेस

अ) ७० मी. पेक्षा कमी उंची असलेल्या इमारतींकरिता ३३%, ३३%, ३४% रक्कमेचे ३ हप्ते १ ल्या, १२ व्या व २४ व्या महिन्यांत

ब) ७० मी. किंवा ७० मी. पेक्षा जास्त उंची असलेल्या इमारतींकरिता २५%, २५%, २५%, २५% रक्कमेचे ४ हप्ते १ ल्या, १२ व्या व २४ व्या व ३६ व्या महिन्यांत

२) विकास नियंत्रण व प्रोत्साहनपर नियमावली २०१७ मधील कलम १७.१, १७.३, १७.४, २४.१ व २४.१० अन्वये महानगरपालिकेकडे देय निवासी, व्यापारी, औद्योगिक व आय.टी.क्षेत्राच्या प्रिमियम एफ.एस.आय. पोटी जमा होणाऱ्या मनपाच्या हिस्स्याचे देय प्रिमियम शुल्क टप्पेनिहाय ८.५०% व्याजासह भरणेस विकसकांना वरीलप्रमाणे सवलत देणेस

३) विकास नियंत्रण व प्रोत्साहनपर नियमावली २०१७ मधील कलम १.४ नुसार डी.सी.पी.आर. २०१७ व डीसीआर वापरण्याच्या विकल्पास २०१७ मधील कलम १७.७, १८.२६ व विकास नियंत्रण नियमावली मधील कलम १५.४.२ अन्वये बाल्कनी, जीना, पॅसेज, डबल हाईट टेरेस इत्यादी मधील देय प्रिमियम शुल्क टप्पेनिहाय ८.५०% व्याजासह भरणेस विकसकांना वरीलप्रमाणे सवलत देणेस

४) दुसरा तीसरा किंवा चौथा हप्ता भरण्यास विलंब झाल्यास १८% प्रतिवर्ष इतक्या दंडाची आकारणी करण्यास

५) शेवटचा हप्ता भरेपर्यंत एकुण बांधीव क्षेत्राच्या १०% अथवा सर्वात वरील एका मजल्याचा (यापैकी जास्तीत जास्त) पूर्णत्वाचा दाखला राखून ठेवण्यास

६) याबाबतची कार्यपध्दती निश्चित करण्याचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना देणेस

७) वरील प्रस्ताव मे.शासनाच्या मान्यतेसाठी सादर करणेस

८) (टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. १४/७/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ३३०**

पुणे शहरातील घरोघरी निर्माण होणाऱ्या वर्गीकृत कचऱ्याचे संकलन करणेकामी स्वच्छ सेवा सहकारी संस्था मर्यादित या संस्थे अंतर्गत कार्यरत कचरा वेचकांस कोविड आजाराच्या अनुषंगाने अतिरिक्त प्रोत्साहन भत्ता देणेसाठी मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/घन.व्य./१४० दि.२५/६/२०२० चे पत्र.

१) वस्ती पातळीवरील दारोदारी कचरा संकलन करणाऱ्या कचरा वेचकांस महानगरपालिकेमार्फत प्रत्येक घरामागे देण्यात येणारा प्रोत्साहन भत्ता हा १० रु. ऐवजी २० रुपये प्रती घर प्रति महिना याप्रमाणे सहा महिने कालावधीकरीता अदा करणेस

२) हा प्रोत्साहन भत्ता पुनर्वसन केलेल्या झोपडपट्ट्या (SRA) तसेच अघोषित झोपडपट्टी क्षेत्रासही लागू करणेस

३) वेळोवेळी आढावा घेऊन धोरणात बदल/आवश्यक ते बदल करण्याचा अधिकार महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस

४) स्वच्छ सहकारी संस्थेचे कामकाज समाधानकारक नसल्यास या संस्थेला पुणे महानगरपालिकेमार्फत देण्यात येणारी मदत तात्काळ थांबविण्यात येईल व पर्यायी व्यवस्था करण्यात येईल व याबाबतचा निर्णय घेण्याचा व पर्यायी व्यवस्था करणेचा अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना प्रदान करणेस

(टिप : सदर विषयाचा विचार १५ दिवसांनी करावा असे दि. १४/७/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. ३३१**

मे.औद्योगिक न्यायालय, पुणे आणि मे.उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशाचे पालन करणेसाठी तक्रारदार माजी सैनिकांच्या बहुउद्देशिय पथकात सुपरवायझर व सहाय्यक यांची सहा महिने मुदतीसाठी करार पध्दतीने सेवा घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/सुरक्षा/१५८ दि.८/७/२०२० चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि. २१/७/२०२० च्या सभेत ठरले होते.)

**संकिर्ण**

**विषय क्र. ३३२**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क मधील तरतूदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणू प्रतिबंधक उपाययोजने अंतर्गत उद्भवलेल्या आपत्कालिन परिस्थितीमध्ये पुणे मनपा हद्दीत लागण झालेल्या रुग्णांच्या व संशयित रुग्णांच्या मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या तकत्यामधील अ.क्र. १ ते १२ नुसार क्वारंटाईन कक्षामध्ये एकूण र.रुपये ५७,७५,८२२=९६ पर्यंत केलेल्या विद्युत विषयक कामांची देयके आदा करणेस व त्यानुसार आवश्यकतेनुसार त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्यात आलेली असून सदरची बाब मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/विद्युत/१८२ दि. २१/७/२०२० चे पत्र.

**विषय क्र. ३३३**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) क मधील तरतूदीच्या अनुषंगाने कोरोना विषाणू प्रतिबंधक उपाययोजने अंतर्गत उद्भवलेल्या आपत्कालिन परिस्थितीमध्ये पुणे मनपा हद्दीत लागण झालेल्या रुग्णांच्या व संशयित रुग्णांच्या डॉ.नायडू हॉस्पीटल येथे करण्यात आलेल्या मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या तकत्यामधील अ.क्र. १ ते २ नुसार विद्युत विषयक कामांची एकूण र.रुपये २७,९६,९०२=६३ पर्यंत केलेल्या विद्युत विषयक कामांची देयके आदा करणेस व त्यानुसार आवश्यकतेनुसार त्यांचेबरोबर करारनामा करणेस मान्यता देण्यात आलेली असून सदरची बाब मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/विद्युत/१८३ दि. २१/७/२०२० चे पत्र.

**विषय क्र.३३४**

पुणे महानगरपालिका झोन क्र.४ वानवडी रामटेकडी कार्यालयाचे कार्यक्षेत्रा अंतर्गत कोव्हीड-१९ प्रतिबंधित क्षेत्रामध्ये रस्ता पत्रे व बांबू च्या सहाय्याने बंदीस्त करणे कामी मे.निलेश तरवडे, झारा एंटरप्रायजेस, विजय भोसले, कबीर पटेल, सतीश मोगरे या एजन्सी कडून सदरचे काम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क) अन्वये करणेसाठी खालील बाबीस मान्यता मिळणेस तसेच मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेस अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/प.क्र.४/१८४ दि.२२/७/२०२० चे पत्र.

वानवडी रामटेकडी कार्यालयांतर्गत प्रभाग क्र. २४, २५ व २७ 'कोविड-१९' विषाणूने प्रतीबंधित क्षेत्रातील गल्लीबोळ, रस्ते हे पत्रे व बांबूच्या सहाय्याने मे.निलेश तरवडे, झारा एंटरप्रायजेस, विजय भोसले, कबीर पटेल, सतीश मोगरे या एजन्सी कडून र.रुपये ९,९०,०५५/- व सह जी.एस.टी. (१२%) प्रमाणे र.रुपये १,१८,८०६=६० असे एकूण र.रुपये ११,०८,८६१=६० देणेस व बिल खालील अर्थशिर्षकामधून अदा करणेस

'सन २०२०-२१ चे अंदाजपत्रक

महसुली कामांसाठी - RE17F 257

Covid-19 अंतर्गत आवश्यक महसुली कामांसाठी (खर्च)

१) मे.निलेश तरवडे, झारा एंटरप्रायजेस, विजय भोसले, कबीर पटेल, सतीश मोगरे यांचेशी करार करणेस.

२) मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रामधील तकत्यातील अ.क्र. १ ते ४ ची अंमलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम ६७ (३) (क) नुसार सदरचे काम संपेपर्यंत करणेस

नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.

(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)

**सुचना - कोरोना विषाणूमुळे उद्भवलेली परिस्थिती विचारात घेवून मे.केंद्र व राज्य शासनाच्या आदेशाचे तंतोतंत पालन करावे ही विनंती. व्हिडीओ कॉन्फरन्सींगची लिंक आपणास व्हॉट्सअॅप द्वारे कळविण्यात येईल.**